
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १५२१
१९५८
REFBK-0010053
REFBK-0010053


सौ. शांताबाई जोशी
बंधरेषा

# बंधरेषा

क वि ता सं ग्र ह

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 90043

सौ. शांताबाई जोशी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ............ वि: ............
क्रमांक ............ नों: दि: ............

★

REFBK-0010053
REFBK-0010053

मूल्य दीड रुपया

सर्वाधिकार कवयित्रीच्या स्वाधीन

★

: मुद्रक :
के. एल्. एन्. राव
मुंबई वैभव प्रेस,
गिरगांव, मुंबई नं. ४

: प्रकाशक :
श्री. बाबुभाई लाखाणी
लाखाणी बुक डेपो,
रामचंद्र बिल्डींग, मुंबई नं. ४

महर्षि अण्णासाहेब कर्वे यांस

## सादर समर्पण



पुणें, ता. ६-९-१९५८

सौ. शांताबाई जोशी यांच्या कांहीं कविता मी चाळून
पाहिल्या व कांहीं वाचल्या. त्यांना कवितेचा नाद
आहे व त्यांना कवीचें मर्महीं कळत. त्यामुळें या
नादापासून होणारा आनंद त्यांना होत असला-
पाहिजे. हें पुस्तक अतिशय उपयोगाचें होईल
व पुरुष, स्त्रिया व मुलें यांना त्यापासून
बोधही होईल. या पुस्तकाचें प्रकाशन
होऊन तें अनेकांकडे जाऊन वाचलें
जावें अशी माझी इच्छा
आहे व तसाच माझा
आशीर्वादहि आहे.

धों. के. कर्वे

अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

# निवेदन

" **चंद्रकले** " नंतर आज तेरा वर्षांनीं माझ्या कांहीं कवितांचा हा दुसरा संग्रह प्रकाशित होण्याचा सुयोग आला आहे. संसारांत स्त्रीला येणाऱ्या अडचणी फार ! त्यांतून प्रसंगानुरूप मनाची ठेवणही बदलत जाते. भावनांचा पाळणा फारच हेलकावे खाऊं लागला कीं, आपोआपच कवितेचा जन्म होतो. त्यामुळें अर्थातच आंतरिक सुखदुःखाबरोबर कविताही बदलत जाते. निदान माझ्या बाबतींत तरी हें घडलं आहे असं मला निश्चित वाटतं. मी कांहीं सराईत कवयित्री नाहीं. केव्हांतरीं कुठेंही मला ओळी स्फुरतात; आणि मग मात्र कविता पुरी केल्याशिवाय राहवत नाहीं. कदाचित् यामुळेंच हा संग्रह निघायला विलंब लागला असावा.



माझ्या पूर्वींच्या कविता वाचल्या कीं, मला आतां हंसू येतं. मला वाटतं, कवीचं कवितेवरचं प्रेम हें खरोखरीच क्षणिक आहे. नाहींतर असं कां व्हावं ? येवढंच काय पण क्षणापूर्वी प्रसवलेलं काव्य देखील मला आवडेनासं होतं. परंतु वेळोवेळीं माझ्या मुलांनीं मला लिहायला आग्रह केला आहे. त्यांच्यामुळेंच मी हा संग्रह काढूं इच्छितें.

" **बंधरेषा** " वाचक सद्भावनेनें वाचतील अशी माझी अपेक्षा आहे.

१६५, कपिलतीर्थ
माहीम, मुंबई १६.

**सौ. शांताबाई जोशी**
ता. १३-१०-५८

# आभार

" बंधरेषा " काव्यसंग्रह काढण्यासाठीं माझे पति श्री. के. बी. जोशी, सॉलिसिटर यांनीं मला वेळोवेळीं उत्तेजन दिलें याबद्दल मी त्यांचे आभार मानतें.

तसेंच या संग्रहांतील बहुतेक सगळ्या कविता त्या त्या वेळीं वसंत, धनुर्धारी, यशवंत, आशा, संगम, द्वारकामाई, समर्थ, जीवन-विकास, माउली, तारका, शृंगार, विविध वृत्त, नवशक्ति, लोकवाणी, ज्योति, शिवनेर, इत्यादि मासिकांतून छापून आल्या आहेत. त्याबद्दल मी संपादकांचे आभार मानतें.

या संग्रहांतील कांहीं भावगीतांना श्री. गजाननराव वाटवे, श्री. यशवंत देव, श्री. गोविंद पोवळे, श्री. दशरथ पुजारी, या नामांकित संगीत दिग्दर्शकांनीं चाली दिल्या आहेत. त्यांची मी आभारी आहे. त्याचप्रमाणें " मुंबई नभोवाणी " आणि " कोलंबिया रेकॉर्ड कंपनी " यांचेही मी आभार मानतें.

" बंधरेषा " प्रकाशित करण्याबद्दल श्री. लाखाणी बुक डेपो यांचीही मी आभारी आहें.

—लेखिका—

# प्रस्तावना

"**चंद्रकला**" हा सौ. शांताबाई जोशी यांच्या प्रकाशित झालेल्या पहिल्या काव्यसंग्रहानंतर हा काव्यसंग्रह तेरा वर्षांनीं प्रसिद्ध होत आहे. या काळांत त्यांचें लेखन चालू होतें. सुखदुःखाचे, आशानिराशांचे, विचारभावनांचे अनेक तरल कवडसे मनांत गोळा होत होते; आणि शब्द आपल्याच नादांत त्यांच्याभोंवतीं फेर धरीत होते.

कित्येक कवींचे काव्यसंग्रह वाचीत असतांना प्रामुख्यानें दोन गुणांचा आढळ आपल्याला होतो. हे दोन गुण म्हणजे चिकाटी आणि हौस. काव्यलेखनाची हौस ही एक मोठी गमतीदार गोष्ट आहे. हा हौसेचा मिस्कील अंकुर रावापासून रंकापर्यंत कोणाच्या मनांत उगवेल हें सांगणें कठिण आहे. या हौसेपासून फायदा तरी कांहीं होतो काय ? या प्रश्नाला होय असें उत्तर देणारा महाभाग सांपडण्याची आशाच नको ! कवीचें दर्शन होतांच "कवि आला चला पळा" असेंच सर्वसाधारण माणूस कधीं मनांत तर कधीं मोठ्यानें म्हणत असतो. आणि त्याला नेहमींच दोष देणेंहि योग्य होणार नाहीं. कारण बऱ्याचशा कवींच्या बाबतींत दुसरा मार्गहि नसतो. ही झाली प्रतिष्ठेविषयींची गोष्ट ! आतां उरला व्यावहारिक फायदा. नफ्यातोट्याचें गणित आणि कवि यांचें कधीं जमल्याचें उदाहरण नाहीं ! "बिकट वाट वहिवाट नसावी, धोपट मार्गा सोडुं नये..." हा उपदेश मनांत न वागवतां असा कवि हा हौसेच्या वारूवर स्वार होऊन काव्याच्या बिकट वाटेलाच लागतो ! असा हा कठिण मामला असूनहि कित्येक कवि आयुष्याच्या अखेरीपर्यंत, वाचकांनीं पाठ फिरवली तरीहि, आपली हौस आणि विशेष म्हणजे चिकाटी न सोडतां लिहीत असतात—सारखे लिहीत असतात. हे दोन गुण म्हणा ( दोष म्हणा ) ज्यांच्यांत नाहींत तीं माणसें कवि होतील ही गोष्ट कदापि शक्य नाहीं !

"**चंद्रकला**" या आपल्या पहिल्या काव्य संग्रहानंतर **सौ. शांताबाई जोशी** यांनीं तेरा वर्षेपर्यंत कवितांचें पुस्तक प्रसिद्ध केलें नाहीं. हा संयम कित्येक कवींपुढें आदर्श म्हणून मला ठेवावासा वाटतो. कित्येकांच्या बाबतींत ही

संयमाची मुदत आणखीहि वाढवावी लागेल–पण त्याविषयीं अधिक चर्चा करण्याचें हें स्थळ नव्हे. आवर्जून सांगावयाचा मुद्दा असा कीं, " बंधरेषा " या काव्यसंग्रहांतल्या बऱ्यचशा कविता हें अशा जिवंत हौसेचें आणि प्रदीर्घ चिकाटीचें फळ आहे. हौसेला मोल नसतें. हौस व्यावहारिक फायद्याचे खुरटे हिशेब मांडीत बसत नाहीं. अशा हौसेच्या बाबतींत " कां ? " हा प्रश्न मुळीं संभवतच नाहीं. संभवतें तें फक्त काव्य ! वेडा, प्रेमिक आणि कवि यांना शेक्सपिअरनें एकाच माळेंत गुंफलें याचें कारण हेंच तर नसेल ना ?

आपली काव्यविषयक भूमिका सौ. शांताबाई जोशी यांनीं छोट्याशा निवेदनांत नम्रपणें मांडली आहे. त्या म्हणतातः " संसारांत स्त्रीला येणाऱ्या अडचणी फार ! त्यांतून प्रसंगानुरूप मनाची ठेवणहि बदलत जाते. भावनांचा पाळणा फारच हेलकावे खाऊं लागला कीं, आपोआपच कवितेचा जन्म होतो. त्यामुळें अर्थातच आंतरिक सुखदुःखाबरोबर कविताहि बदलत जाते... केंव्हांतरी कुठेंहि मला ओळी स्फुरतात आणि मग मात्र कविता पुरी केल्याशिवाय राहवत नाहीं. "... " बंधरेषा " या आपल्या पहिल्याच कवितेंत त्यांनीं आपली हीच भूमिका छंदोबद्ध करून मांडली आहे. त्या म्हणतातः

मन माझें वेडें भारी धांवतें कल्पनांमागून
कधिं असतां निवडित दाणे
चिउताइ पुढें चिवचिवते
ते तिचे पंख चोरुनिया
मन वाऱ्यामागें जातें....

असें हें भावनाशील मन आहे. जगाचा गलबला जगांतच सोडून हें कवि-मन चिवचिवणाऱ्या चिमणीच्या मागें तंद्रींत धावत जातें. आणि मग ' त्या स्वप्नाच्या गवसणींत हात थांबून राहतात.'

" असं क्षणोक्षणीं घडतांना
मी जगांत असुनि नसतें "

अशी या मनाची स्थिति असते. काव्यनिर्मितीच्या या तरल मनोवस्थेचें वर्णन सहृदयतेनें करण्याचा प्रयत्न सौ. शांताबाई जोशी यांनीं या पहिल्या

कवितेंत केला आहे. काव्यविषयक भूमिकेचें स्पष्टीकरण उदाहरणें देऊन करणारी कविता असल्यामुळें ती या संग्रहांतली एक महत्त्वाची कविता आहे. असें म्हणावयास हरकत नाहीं.

प्रेमाच्या सोज्वळ भावना, ईश्वरविषयक भक्ति निसर्गाचें प्रेम, वात्सल्य, महात्म्यांविषयीं आदरभाव, कधीं अकारण वाटणारी खिन्नता, जीवनांतली सुखदु:खें अनुभवल्यानंतर येणारे विचार इत्यादि अनेक विषय सौ. शांताबाई जोशी यांनीं आपल्या कवितांत हाताळण्याचा प्रयत्न केला आहे.

या सर्वच कवितेंतल्या भावना-विचारांत एक प्रकारचा स्वच्छ बाळबोधपणा आहे. भक्तीच्या बहुतेक कविता कृष्णाभोंवतींच गुंफलेल्या आहेत.

कधि पूजित असतां श्याम
ती मूर्ति बोलकी होते
धरुनिया हात हातांत
गोकुळांत घेउनि जाते

असें या भावनेचें वर्णन त्यांनीं केलें आहे. जनाबाईला दळणांत मदत करणाऱ्या कृष्णाचें वर्णन त्यांनीं तन्मयतेनें करण्याचा प्रयत्न केला आहे.

आभाळींचा चांद माझ्या आज अंगणांत
पंढरीचा राया दळी जनीच्या घरांत

अशी सुरवात करून त्या शेवटीं लिहितातः

"किती माझ्यासंगे गाऊनिया गाणीं
भागलासी आतां तूं रे चक्रपाणी
कटीं पितांबर शोभे गळां वैजयंति माला
असा हरी गरीबाच्या झोपडींत झोपीं गेला."

कधीं आपल्या भक्तिविषयक कवितांतून त्या कृष्णाशीं होणारें भावनात्मक तादात्म्यहि वर्णितांना दिसतातः

माझा हरी काम करी माझ्या हातासंगे
माझ्यासवें मुकुंदाच्या भजनांत रंगे
एकरूप झालेला हा सखा कां निराळा
माझी काया पंढरी ही मनांत सांवळा,

लहान मुलें समुद्रकिनाऱ्यावर खेळत असतांना ज्या निरागसतेनें शंखशिंपले गोळा करतात त्या प्रमाणेंच भक्तिभावनेविषयींचे अनेक निर्मळ सुंदर संकेत सौ. शांताबाई जोशी यांनीं गोळा केले आहेत–आणि साध्या सोप्या शब्दांतून ते व्यक्त केले आहेत. या कवितांचा सोपेपणा आणि गेयता हे तर त्यांचे गुण आहेत. चांगले संस्कार होण्याच्या दृष्टीनें घरांतल्या मुलीबाळींना भक्तीचीं गोड गाणीं म्हणावयास हवींच असतात. सोपेपणा आणि गेयता या दोन्ही गोष्टी या शब्दांत असल्यामुळें या दृष्टीनें हीं गाणीं उपयुक्त ठरतील या विषयीं कुणाचें दुमत होईल असें मला वाटत नाहीं.

या काव्यसंग्रहांतल्या प्रेमविषयक कविताहि अशाच सुंदर सुंदर संकेतांनीं, विचारांनीं बहरलेल्या आहेत. प्रेम हेंच वैभव आहे. असें प्रेम जर मनांत असेल, तर बाह्य वैभवाची गरज तरी काय असें त्या विचारतात. असें प्रेम असतांना "चंद्रमौळी घरकुलांतहि चंद्रकिरण विहरतात आणि पंकांतहि कोमल मृदुल मृणाल" फुलतें असा त्यांचा विश्वास आहे. या गाढ विश्वासाच्या जाणिवेमुळेंच सौ. शांताबाई जोशी लिहितात :

तुझ्याच सखया मनांत मी रे
मानसमंदिरिं मूर्ति तुझी रे

राजाराणी आपण दोघें कशास ताजमहाल
तुझ्यावांचुनी नकोच राया मजला राजमहाल !

अशा या प्रीतिविषयक निष्ठेमुळेंच प्रीतीच्या कळया बहरतात आणि त्यांचें भावफुलांत रूपांतर होतें. ही भावना त्यांनीं कशी व्यक्त केली आहे पहा :

चांदण्यांच्या प्रीतिकळ्या
गगनांगणीं वेंचिल्या
सखया तुला पाहतांच
अंतरीं त्या बहरल्या
लता मी नाजुक हळूच हसलें
तुला ओळखिलें, तुला भाळलें
हृदयामधल्या भावफुलांचा
हार तुला अर्पिला.

हें प्रेमाचें तृप्त समर्पण व्यक्त करीत असतांनाच जीवनांत जाणवणाऱ्या व्यथेचीहि त्यांना जाणीव आहे. या जाणिवेमुळेंच त्या कधीं खिन्नतेनें लिहितात.

परी गंध तो क्षण दरवळला
आज कसा रे लोपुनि गेला
एक उरे पण भाव मनांतिल
मधुमास ओसरला .... !

प्रेमाची हळवी भावना व्यक्त करीत असतांना कधीं त्यांच्या शब्दांना विलक्षण नाजूकपणा प्राप्त होतो. त्यांनीं नववधूचें केलेलें वर्णन या दृष्टीनें वानगी म्हणून देण्यासारखें आहे.

नांव बाई तांदुळांत त्यांनीं माझें कोरिलें
कांहींतरी मधुर कुणीं हळूच कानीं बोललें
नव्या घरीं मी आलें बाई
लक्ष्मी झालें त्यांची मी ही
सासू माझी माता जशी लेक गडे शोभलें

प्रेमाच्या अशा भावनांप्रमाणेंच स्त्रीसुलभ वात्सल्याची भावनाहि त्यांनीं आपल्या कांहीं कवितांतून आळवलेली आहे. या भावनेंतला प्रामाणिकपणा जाणवतो. चिरपरिचित संकेत आणि वात्सल्याचा गोडवा यांच्या मिश्रणानें या कविता निर्माण झालेल्या आहेत. अशा या कवितेचें एक उदाहरण मुद्दाम येथें देतोंः

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें, स्थलप्रत.

माझ्या ग बागेमधें बटमोगरा फुलला
तैसा बाळ दिसायाला तेजदार
माझ्या ग गवाक्षांत खेळे पांखरूं इवलें
तैसीं बाळाचीं पाउलें घरभर
माझ्या ग दारावरनं राजा झुलतच गेला
तैसा पाहीन बाळाला मोठेपणीं
जैसें गंगेच्या जळांत पुण्यवंताचें बिंब
तैसा माझिया डोळ्यांत बाळ माझा.

अशी ही कविता आहे. साधी सोपी आणि निर्मळ हौस, चिकाटी, तळमळ. शब्दाचें प्रेम, परंपरागत चालत आलेल्या चांगल्या संकेतांविषयीचें प्रेम इत्यादि बरेच गुण तिच्यांत दिसतात. स्त्रीहृदयाचा जिव्हाळा आणि प्रेम यांचा कित्येक ठिकाणीं हृद्य आविष्कार झालेला दिसतो.

बऱ्याच वर्षांनीं त्यांचा हा दुसरा काव्यसंग्रह वाचकांच्या हातीं पडत आहे. हा काव्यसंग्रह सद्‌भावनेनें वाचला जावा अशी नम्र अपेक्षा त्यांनीं आपल्या निवेदनांत व्यक्त केली आहे. ही सद्‌भावना त्यांना मिळो अशी इच्छा व्यक्त करून मी वाचकांना त्यांच्या कवितांकडे वळण्याची विनंति करतों.

साईप्रसाद
१२५/अ, सायन,
मुंबई, २२.

**मंगेश पाडगांवकर**

# बंधरेषा

अनुक्रम ................ वि: ................
क्रमांक ................ नों. दि: ................

मन माझें वेडे भारी, धांवते कल्पना मागून
म्हणुनी मी घेतली अशी, बंधरेष रेखऊन ॥ धृ० ॥

कधीं असतां निवडीत दाणे
चिऊताई पुढें चिवचिवते
तें तिचें पंख चोरुनिया
मन वाऱ्यामागें जाते,
गवसणींत त्या स्वप्नाच्या, हें हात राहती थांबून—१

90043

कधीं दिसतां मोरपिसारा
ती छुम्‌छुम् नकळे येते
कुठे असतां परि प्रत्यंगीं
वर्षेत न्हाऊनी निघते
पाऊलांत त्या नृत्याच्या, मी राही मज विसरुन—२

कधीं असतां पूजित श्याम
ती मूर्ति बोलकी होते
धरुनियां हात हातांत
गोकुळांत घेऊनि जाते
त्या तिथें रास-खेळांत, रंगते राधिका होऊन—३

असं क्षणोक्षणीं घडतांना
मी जगांत असुनि-नसते
यासाठीं मनाशीं माझ्या
हा अबोल रुसवा धरते
संसारीं सदोदीत आतां, सर्वस्वीं गुंतुनि राहीन—४
म्हणुनी मी घेतली अशी बंधरेष रेखऊन ॥ धृ० ॥

—शशी 'नोन्हैं.' दिवाळी अंक. १९५८.

# उठ राजसा घननीळा

उठ राजसा घननीळा हांसली रे वनराणी ।
उडे थवा पाखरांचा गात गात मंजुळ गाणीं ॥

यमुनेचं गार गार खळाळलं आतां पाणी ।
ऊठ सख्या नीलमणी साद घालीती गौळणी॥

नेत्रकमळें उघड बाळा पुष्प सांगे डोलुनी ।
सांगतो रे ऊठ राजा मंद वारा वाहुनी ॥

जाग आली गोकुळाला नाद छुम् छुम् पैंजणीं ।
ऐकु येई धेनुची ही हांक तुझीया अंगणीं ॥

कोलंबिया रेकॉर्ड नं. GF23221

# महर्षि अण्णासाहेब कर्वे

अमरवेलीवर एक
सदा उमलतें फूल
स्वयें भारती जयाचा
करी अखंड सांभाळ १

शतपाकळ्यांचे पुष्प
सदा हांसरें गोजिरें
त्याची अबाधित कीर्ति
त्रिलोकांत खेळे फिरे २

देवी स्वयें घाली रोज,
त्यांस मोतियांचें जल
तिज तेवढें माहीत
त्याच्या गुपिताचे बोल ३

" शतपाकळ्यांत त्याच्या
कैक कटु तपें, दुःख
दुजा सुगंध देण्यांत
तरी मानियलें सुख " ४

कण विश्वाचे केवळ
दृश्य गुणांवर राजी
अंतर्दाहाची तेवढी
कोणा कशास काळजी ? ५

अशा अलौकिक जीवां,
सरस्वती धरी छाया
तिची पखरण राहो
त्यांसी उदंड फुलाया ६

"वसंत" मे १९५८ महर्षि कर्वे विशेषांक

## आभाळींचा चांद

आभाळींचा चांद माझ्या आज अंगणांत
पंढरीचा राया दळी जनीच्या घरांत
किती करी काम देवा घेई रे विसांवा देवा
हेच ऐक येवढे रे मान किती घ्यावा
घनश्याम विठ्ठला रे पंढरीच्या नाथा राया
धावुनिया भक्तापाठी वृथा शिणवाया
जरा थांबू देरे देवा कोमल हे हात तुझे ॥

किती माझ्यासंगे गाऊनियां गाणीं
भागलासी आतां तूं रे चक्रपाणी
कटी पितांबर शोभे गळां वैजयंतिमाला
असा हरी गरीबाच्या झोपडींत झोपी गेला
सांवळीच गोजिरी ही मूर्ति सदा नयनांत ॥

कोलंबिया रेकॉर्ड नं. GF23221.

# फूल

मज हळुंच पाही रे राया,
मी मधुमालतीचें फूल
फुलविते गंध मधु—कोष,
लागतां तुझी चाहूल ॥ ध्रु० ॥

जोंवरी उषेला लाली
तोंवरी मुग्ध मी कळीं
मिटुन पाकळी—
स्वप्नांत पहाटेच्या कुणि फेंकला गुलाल ॥ १ ॥

मधुरंग बाई तो पसरे,
अंगअंग करूनि ओलें,
अन् मी उघडितांच डोळे,
मदिरेंत भ्रमर हा गुंग नयन ते धुंदही विलोल ॥ २ ॥

मी पाहुनिया ठेवी अंतरीं
तोंच तुझी रे दृष्टी बावरी,
हृदयभावना पदर सांवरी,
फुलुनि येती पांच पाकळ्या रवि नकोरे चुंबूं कपोल ॥ ३ ॥

वसंत दिवाळी–अंक, १९५४.

# इवला चिमुकला मीन

इवला चिमुकला मीन
जैसा पाण्यांत खेळतो
तैसा कृष्ण कन्हैया
माझ्या डोळ्यांत हसतो ॥ १ ॥

इवला चिमुकला मीन
कधी जलावरी येई
तसा देव सखा माझा
हळु डोकावुनि पाही ॥ २ ॥

इवला चिमुकला मीन
कधी खोल मारी दडी
माझ्या मुरारीची तसी
भक्तहृदयांत उडी ॥ ३ ॥

इवला चिमुकला मीन
कसा कोणाला मिळावा ?
अथांगाच्या उरीं त्याचा
शांत गंभीर विसावा ॥ ४ ॥

माझा ऐसाचि ग देव
मूर्ति छोटी वाटतसे
मनांमनांवर परी,
त्याचे सांपडती ठसे ॥ ५ ॥

जीवन-विकास, एप्रिल १९५८.

ह्या सोपानाची वाट,
 मींच तुला दाखविली ।
ध्येयाचीही आंच आर्त,
 मींच तुला लावियेली ॥

मजसाठीं होतें तेव्हां,
 तुझें देवपण ।
खुळ्या कल्पनेंत वेडे,
 माझे भावकण ॥

आणि आज तूं रे,
 केलीस पूर्तता ।
माझिया ही ठायीं,
 तुझी मानसरिता ॥

परी शल्य मनीं
 सतत राहिलें ॥
दुरावले तुला राया,
—तुझ्याविना जीव पोळे ॥

वसंत, दिवाळी-अंक, १९५७

# समाधान

नाहीं तुझ्या ठेवणींत
अनुपम सुरेखता ॥
तरी नजरेंत भरे,
कांहीं गूढ मादकता—१

नाहीं नाक चाफेकळी
मागमूस दिव्यत्वाचा
परी तरतरी हांसे
भुलावित मना माझ्या—२

नाहीं नाजूक ग बांधा
भाव कसा भोळा साधा
तरी छाप उमटे ग
तुझी माझ्यावरी सदा—३

नकळतां माया जडे
मोह पुन्हां पुन्हां पडे
आणि तुला पाहतांना
समाधान माझें वाढे—४

धनुर्धारी, दिवाळी-अंक, १९५७.

# तूं नी मी

तुझ्या लाल अधरांत
यौवनांतलें गीत ।
माझ्या नसांतुनी खेळे
क्रांतीचें संगीत ।।

तुझ्या कपोलीं हळूंच हांसे
गुलाबांतली छटा ।
जास्वंदीचा रंग खुलतो
स्वप्नीं माझ्या सदा ।।

प्रिये, तरळते तुझ्या लोचनीं,
मनोरथांची नौका ।
गतकालांतील विविध भावना
उडविती माझ्या सुखा ।।

आम्रतरूचा मोहर तुजला
करितो घायाळ ।
तुझी मूर्ति पण इथें फेकितें
अचूक मोहजाल ।।

वसंत, फेब्रु. १९५७.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 90043

# पूर्ति

जीवनांत मरणाची भीति
विफलतेंत प्रेमाची पूर्ति ॥ ध्रु० ॥

पंकांत कमल फुलतें
सौंदर्य गरिबींत हंसतें
रात्रींत चंद्राची वसती ॥ १ ॥

हास्यांत अश्रु खेळे
आशेंत भंग डोले
साध्यांत देवमूर्ति ॥ २ ॥

विभवास विपत्ति म्हणते
रे मी तुझ्यासवें येते
गुणाला बंध कां पडती ? ॥ ३ ॥
विफलतेंत प्रेमाची पूर्ति ॥

वसंत, मे, १९५७.

# मनोरथ

धांवसि कां नभीं वृथा ?
थांब थांब मनोरथा ॥

पाहियलें जरी इंद्रासन तूं
ऐकियले जरी नंदनवन तूं
सोड मोह तो सख्या परंतु
फिरव पाठ रे स्वर्ग संगिता !--१

झेंप तुझी ही क्षितिजावर
रंग बदलते बघसि मधुतर
तुला हवें हें उडतें जीवन
ध्यानीं परी रे वास्तव येतां--२

शीक एक तूं प्रीति निर्मल
जाण गुज जें वत्सल मंगल
सत्य जगाचें अविरत कोमल
वळव नयन तव तेथें अतां !--३

लोकवाणी, दिवाळी-अंक, १९५६.

# तुझ्या मुरलींत

तुझ्या मुरलींत माझी प्रतिमा दिसे
माझ्या डोळ्यांत मूर्ति तुझी विलसे ॥ धृ० ॥

पदकमलें जी हरीची नाजूक
पैंजणेंच मी त्यांतील मोहक
प्रभूची प्रिती मनी या आणिक
प्रेमळ भाव वसे ॥ १ ॥

कृष्ण मोहना मी तव माया
कमल-मुखांतील वाणी मी राया
तुझीच सेवा सुखवी हृदया
अंतरीं श्याम हंसे ॥ २ ॥

कोलंबिया रेकार्ड नं. GF23229

# चला मुलांनो

चला मुलांनो या रे या
टिपऱ्या आपण खेळूं या
अपुल्यासंगें खेळायाला ।
चंद्रिकांना बोलवूं या ॥ धृ० ॥

रंग आला आभाळाचा
खेळांत अपुल्या
संध्येवर बसुनी अन्
कलीकाही आल्या
पाकळींत दंवबिंदू येईं
बाईं गारवा ॥ १ ॥

बाई नाच नाचूं या
हांस हांस हासूं या
जाईजुई अपुल्यांत
फुलें घेऊं या
आला आणि वारा
त्यांस बोलवा ॥ २ ॥

टिपऱ्या आपण खेळूं या ॥

नवशक्ति १९-५-१९५७
( नभोवाणीच्या सौजन्यानें )

# पूर्तता

तुजपासुनि राहियले
आजवरी मी अलिप्त
कळलें परि प्रेम कसें
होईल ऐसें समाप्त । १

लुकलुकतें तारांगण
आवडतें मज भारी
क्षितिजावर माझीही
स्वप्नाळू मनभरारी । २

आणि तूं–? ध्येयप्रिय
चिंतनशील नववादी
कैसें मी पटवावें ?—
तूं सळसळ, मी साधी । ३

झालें रे मुक्त क्षणीं
तोडूनि हे बंधपाश
भास–कसा 'रमवील रे
मजला हा अवकाश' । ४

उलगडले उशीरां पण,
संसारीं काव्य वसे
भाव हळूं जुळविण्यांत
पूर्तताही खेळतसे । ५

वसंत, एप्रिल, १९५८.

# खुलें स्वर्गींचें भांडार

खुलें स्वर्गींचें भांडार
आज पृथ्वीवर झालें ।
त्याचेंच हें पांचूमोती
जागोजागीं विखुरले ॥ १ ॥

कोणी लपले पानांत
कोणी लाटांत फेंसाळ ।
कांहीं फुलाफुलांतून
मधु हांसती खट्याळ ॥ २ ॥

खजिना हा वेंचायाला
बालमन खालीं आलें ।
बघुनियां सृष्टिपरी
क्षणभर भांबावलें ॥ ३ ॥

आणि बाल्य वेध घेत
घेई टिपुनियां सारे
कळीकळीवर त्याचे
उमटती अन् कंगोरे ॥ ४ ॥

सांठविली लयलूट
    सान सौख्याची अमोघ
इवला हा विसरला
    काळ प्रवाहाचा ओघ ॥ ५ ॥

जई जाहली जाणीव
    मन बदलुनी बोलें
उपभोग आठवतां
    सारें ठेवूनी घेतलें ॥ ६ ॥

हेंच मानवाचे रुप
    देवा, तव घात पुरा
अजुनी स्वयें येतां तुज,
    पडे मृगांतली धारा ॥ ७ ॥

भगिनी समाज,
रौप्यमहोत्सव-विशेषांक
'ज्योति' १९५८

# तुजसाठीं

तूं यावासी म्हणुनी
केली अखंड प्रतीक्षा।
तुझी स्मृति हीच होती
माझ्या जीवनाची कक्षा ॥-१

झरे अमृताचे तेव्हां
दाट भावनांची छाया।
एकलीच होतें मी रे
साऊलींत बैसावया ॥ -२

वाट पाहतां पाहतां
सारें आटुनियां गेलें ।
माझें स्वप्नाळू नयन
सख्या निस्तेज जाहले ॥ -३

आणि अचानक येसी
जरी झाली ध्येयपूर्ति ।
तुजसाठीं जळुनियां
गेली रिझुनी ही ज्योती ॥ -४

तारका, दिवाळी-अंक, १९५७.

## तुजपुढें सखे

चांदणीचे कंगोरे
   तिला सौंदर्य देतात ।
तशी तुझी जादू सखे
   तुझ्या उभारपणांत ।।—१

तुला न्याहाळितां माझी
   प्रिती लाजुनि जाते ।
साधनाही तुजपुढें
   माझी अपूरी पडते ।।—२

विविध वृत्त, दिवाळी-अंक, १९५७.

तूं झालीस अबोली,
ओंठ मिटुनी कोरीव ।
डोळ्यांतील भाव परि,
सखे बोलके अतीव ॥—१

नको उत्तर मजला
रहा मुग्ध तूं अशीच
मुखांवरी ओसंडते
तुझ्या मनांतील आंच ॥—२

शृंगार, दिवाळी-अंक, १९५७.

# उणीव

तूं दुजांचा झालास
मी तुझीच राहिलें ।
जीवनाची भैरवी
आळवीत बैसलें १

होत्या उदात्त कल्पना,
परि संदिग्ध बोलणें
केव्हांतरी अंतरांत
अति हळूं हेलावणें २

होतो कितिदां एकत्र
तरी एकच कटाक्ष
भाव लपविण्यासाठीं
सदां माझें गुंगे लक्ष ३

परि आज होतें
मनाला जाणीव
तूं नसतांना भासे
कांहीं सखोल उणीव ४

संगम, दिवाळी-अंक, १९५७.

# खेड्यांतील घर

स्मरतो का अजून सखें, खेड्यांतील पार ।
ज्याखालीं घर अपुलें इवलासा संसार ।। धृ० ।।

सभोंवार ती शेती कुरणांतील वत्सें ।
बागडती, हंबरती; मंगलता स्पर्शें ।।
नयनीं त्या ओढ असे मातेची अनिवार ।। १ ।।

अंगणांत पारिजात सुगंधित आसमंत ।
वायुही तो खेळ प्रीतिचा संदेश देत ।।
दृष्टी-पथीं गगन निळें एक धरतीचा आधार ।। २ ।।

दाराशीं पुष्पसडा माजघरीं देव्हारा ।
ज्या जवळीं मिणमिणत्या ज्योतीचा पहारा ।।
शुचिष्मंत वलय तिचें स्वप्न करीं साकार ।। ३ ।।

जेथें तेथें लक्ष्मीचा वास दिसून येई ।।
मानवता मधुस्मितांची श्रीमंती होई ।
भीतिचा लवलेश नुरे देवही राखणदार ।। ४ ।।

वसंत,-अंक.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. एकत्रीत.
अनुक्रम २४७५९ वि: ०१.८५
क्रमांक ...... नों: दि: २९/११/८५

# पवित्रता अंतरींची

बाई माझा देव विठ्ठल ग भोळा,
माझी काया पंढरी ही मनांत सांवळा ॥ धृ० ॥

हृदयींच्या सिंहासनीं बसे चिंतामणि,
रखुमाई शेजारी अन् हंसे रूपखाणी,
सभोंवतीं जोडूनि कर भावनांचा मेळा ॥ १ ॥

माझा हरी काम करी माझ्या हातासंगे,
माझ्यासवें मुकुंदाच्या भजनांत रंगे,
एकरूप झालेला हा सखा कां निराळा ॥ २ ॥

नगरींत ह्या सोज्ज्वल चंद्रभागा खळखळे,
**पवित्रता अंतरींची** देवाठायीं खेळे,
ह्याच जळीं शूचिर्भूत मी अंकुर कोंवळा ॥ ३ ॥

यशवंत, दिवाळी-अंक, १९५४.

# नांव बाई तांदुळांत

नांव बाई तांदुळांत त्यांनीं माझें कोरिले ।
कांहींतरी मधुर कुणी हळूंच कानीं बोलले ॥धृ०॥

नव्या घरीं मी आले बाई
लक्ष्मी झाले त्यांची मी ही
सासू माझी माता जशी लेक गडे शोभले ॥ १ ॥

संसारांतील पहिलें पाऊल
हंसवील फुलवील माझें घरकुल
नंदनवनीं ह्या आज फुलोरे प्रितीचे फुलले ॥२॥

आईची ही वेडी माया
कशी बाई पण झाली किमया
स्वारीच्या प्रेमासाठीं माहेर आज सोडले ॥३॥

समर्थ, दिवाळी-अंक, १९५७.

# कळ्या मी वेंचिल्या

चांदण्यांच्या प्रीतिकळ्या
ग ग नां ग णीं वें चि ल्या
सखया, तुला पाहतांच
अंतरीं त्या बहरल्या ॥ १ ॥

लता मी नाजुक हळूच हंसलें
तुज ओळखिलें, तुला भाळलें
हृदयामधल्या भावफुलांचा
हार तुला अर्पिला ॥ २ ॥

अपुली ती मी निर्मल प्रीति
टिपुनि घेतली गालांवरती
त्या प्रेमाचा रंग गुलाबी
मा र्गा व रि सां ड ला ॥ ३ ॥

परी गंध तो क्षण दरवळला
आज कसा रे लोपुनी गेला
एक उरे पण भाव मनांतिल
म धु मा स ओ स र ला ॥ ४ ॥

वसंत, सप्टेंबर, १९५४

# लाजरी बाई नयनपाकळी

लाजरी बाई नयनपाकळी
क्षणीं उमलली हळूंच मिटली,
मधुनी खुलली कळी ।। धृ० ।।

लोचनींच्या ह्या दर्पणांत ग,
भाव पाहती रूप आपुलें,
भुलुनी सखये मुग्ध हांसती,
उगींच रुसती कशास नकळे,
खेळाची ह्या गोडी आगळी ।। १ ।।

नवरस तुझिया नयनीं नटले,
नील आसूंनीं गीत गाइलें,
पापणींत अन् स्वप्नें भोळीं ।। २ ।।
लाजरी बाई नयनपाकळी !

शृंगार, दिवाळी-अंक, १९५४.

# निळे निळे पाणी

निळें निळें पाणी तुझ्या नाचे डोळ्यांतळें,
संथ संथ त्यावरही नौका माझी डोले ॥ धृ० ॥

प्रितीपुष्प गोजिरें हळूं हळूं फुलें,
पुनवेची चंद्रकला शांत जळीं हाले ॥ १ ॥

तव राया नीळनयनांत विसांवले
परि हुरहुर मनीं कांहींतरी बोले ॥ २ ॥

कधि वाटे येतील रे मेघ नभीं काळे,
उठतील कां मधुनि, अशा दर्यांत वादळें ॥ ३ ॥

किनाऱ्याला जाऊं कशी तूं आणि मी रे
शंकित पण बाई कसें हृदय असें झालें ॥ ४ ॥

असतां तूं साथी, जणूं मीना मी तुझी
मोहांनीं फेंकियलें अलगद् हें जाळें ॥ ५ ॥

आशा, दिवाळी-अंक, १९५४.

# अ भं ग

अभंगाची गोडी करी ज्यास वेडी
तोचि पुण्य जोडी, पंढरीचे.... ॥ १ ॥

टाळ मृदंगाची, वीणा साथ ज्याची
भक्ति पाही तोचि, विठ्ठलाची....॥ २ ॥

बघा संतमेळा, पंढरपुराला
तिरी बैसलेला, देवापाशीं ... ॥ ३ ॥

माहेर अपुलें, मंदिर तेथलें
संत गुंगलेले, भजनांत ... ॥ ४ ॥

गाभाऱ्यांत कोण उभा विठू जाण
चोखोबा तिष्ठत, अंगणांत .... ॥ ५ ॥

पुढें पायरीला, नामया थांबला
शेजारी तुकया, समाधिस्थ .... ॥ ६ ॥

आणि सखू आली, जनी बहिणाई
जमलेली सारी, दर्शनाला ... ॥ ७ ॥

पहा हा सोहळा, मोक्षाचा उमाळा
पुण्य पदराला, बांधावे हो .... ॥ ८ ॥

माऊली–तुकाराम–विशेषांक, १९५८.

# हिरव्या हिरव्या झाडांवर

हिरव्या हिरव्या झाडांवर,
हिरव्या शेवग्याच्या शेंगा ।

शुभ्र चांदोबाभोंवतीं
चंद्रिका ग घाली पिंगा ॥ १ ॥

केवड्याच्या वनांतरी
नाग पिवळा घाली विळखा ।

अवसेच्या रातीं नभीं
काळा मेघ होई सखा ॥ २ ॥

ऐसें सखे साधर्म्य हें
प्रेमिकांत वागे एक ।

जरीं भिन्न देह दोन्हीं
प्रीतिभाव हृदयांत ॥ ३ ॥

द्वारकामाई, दिवाळी–अंक, १९५४

# शृंगार

गळ्यामधें घाला सखी शेवंतीचे हार
पुष्पांनीं सजवा मी पिवळी जर्द नार ॥ धृ०॥

मुलली ग बाई मला रसरसली ज्वानी
केवड्याच्या वनांतरी डुले नागफणी
बांसरीचा सूर करी मधुनि बेजार ॥ १ ॥

कधिं सखये गीत जुळे ओंठावरी नाचे
चाहूल ग कुणी देतां मन माझें हांसे,
चोंहीकडे जगीं माझ्या भरला शृंगार ॥ २ ॥

शृंगार, दिवाळी–अंक, १९५७.

# नको रे ताजमहाल

नको रे आपुल्या प्रीतीचा सुंदर ताजमहाल ।
तुझ्यावांचुनि नकोच राया मजला राजमहाल ॥

प्रेमाला रे साज कशाला ?
शृंगाराचा रंग कशाला ?
प्रेमळ, निर्मळ हृदयकमळें असूं दे मग कंगाल ॥

चंद्रमौळी घरकुलांत हीं
चंद्रकिरण रे बागडती हीं
पंकांतहि अन् हांसे सखया कोमल मृदुल मृणाल ॥

तुझ्याच सखया मनांत मी रे
मानसमंदिरीं मूर्ति तुझी रे,
राजाराणी आपण दोघे कशास ताजमहाल ॥

वसंत

# भक्तिरस

यमुना काळीं काळ्या तीराला,
॥ घेऊन ओंठीं सुधा, बैसला मोहन काळा काळा ॥
राधा गोरी गोरी, बांधिते पायीं रुणुझुणुं वाळा
बैसला मोहन काळा काळा ॥ धृ० ॥

किंचित् हळूं तो अधर दाबुनि,
नयनपाकळींत भृंग लपवुनि,
मुख करूनि वर, धनु मुरडुनि
खुणवी घननीळा ॥ १ ॥

नाजूक चंचल बोटें फिरलीं,
स्वर्गीं मेनका क्षण थबकली,
भूवरि मंजुळ गीतें घुमलीं,
भक्ति-रस रंगला ॥ २ ॥

वसुधा ल्याली मंगल लेणें,
दृश्य पाहतां गोजिरवाणें,
मेघही आला बघण्या गगनीं,
खुलवित रंग निळा ॥ ३ ॥

# बाळ माझा

माझ्या ग बागेमध्यें बटमोगरा फुलला
तैसा बाळ दिसायाला, तेजदार ....॥ १॥

माझ्या ग गवाक्षांत, खेळे पांखरूं इवले
तैसीं बाळाचीं पाऊलें, घरभर ....॥ २॥

माझ्या ग ओसरींत, वायु नाचे सैरावैरा,
बाळ धांवें साऱ्या, अंगणांत ....॥ ३॥

माझ्या ग आंब्यावर कोकिळा बोले कुहू,
बाळाचे बोल तैसे, येतीं ऐकूं ....॥ ४॥

माझ्या ग दारावरनं राजा झुलतच गेला,
तैसा पाहीन बाळाला, मोठेपणीं ... ॥ ५॥

जैसें गंगेच्या जळांत, पुण्यवंताचें बिंब,
तैसा माझिया डोळ्यांत, बाळ माझा ....॥ ६॥

वसंत, १९५७.

# छाप

फुलपांखराची छाप
कशी तुजवर पडली ?
रंग वेगळाले दिसतीं
तुझें पावलोपावलीं ॥ १ ॥

त्याचा इवलासा देह
फूलफूल बदलतो
परि सुगंध अचूक
त्याच्या मागेंमागें येतो ॥ २ ॥

तशी तुझी रीत सखे,
मन अस्थिर नाचरें
तरी चमक त्यांतील
क्षणीं नजरेंत भरे ॥ ३॥

## आज लिहितांना वाटे

आज लिहितांना वाटे, नको कृष्ण गोकुळींचा ।
नको कल्पनेचा पिंगा, रसरंग पौर्णिमेचा ॥

नको भावना लाजरी, प्रीतकळी कोमलांगीं ।
वाटे त्यजावासा आतां, दृश्यभाव अनुरागीं ॥

लेखणीनें रंगवावी, खरी मनांतील तृष्णा ।
करीं वाट द्यावी माझ्या अंतरीच्या कणाकणा ॥

परि हात हेलावतो, लय कंप घेते ।
मजसाठीं नाहीं तरी, जगासाठीं थबकते ॥

## पंढरी

रूप विठ्ठलाचे पंढरी बघावें
टिपुनियां नयनांत सर्वें बाळगावें —॥ धृ० ॥

जीवनीचें दुःख पर्वता इतुकें
हीच संतवाणी संसारही हांके
रतिभर सुख देवापाशीं घ्यावें —१

इथें चंद्रभागा प्रीतीची सरीता
कोटी जनांचा भगवंत त्राता
मदतीस त्यानें संत बैसविले —२

विठू विटेवरी कटीं हात ठेवी
भाव कौतुकाचे रखुमाई दावी
भक्तिसुधेचे कलशही प्यावे —३

# मी पाहिलें त्यांत

बिलोरी आरशापुढें,
टपोऱ्या ह्या नयनांत
घातलें मी अंजन
दाहक बाधक भावना
क्षणीं गेली वितळून
मीं पाहिलें त्यांत —
प्रितीचे रुपडें ॥ १ ॥ बिलोरी....

बिलोरी आरशापुढें,
स्वैर करड्या केशपाशीं
गुंफियलें मी पुष्प,
गंध त्याचा मुखावरी
ओसंडला निष्पाप
मीं पाहिलें त्यांत—
सौंदर्याचें कोडें ॥ २ ॥ बिलोरी....

बिलोरी आरशापुढें
नाजूक झंकारांत
हळूंच मी वेळविली मान
झटक्यांत त्या आले
नवीनाला संजीवन
मीं पाहिलें त्यांत—
निर्माल्याला तडे ॥ ३ ॥ बिलोरी....

# मग खुशाल तुडवा

क्षण एकच द्याहो मज
वाऱ्यावरी सोडून
भिंगरी बांधुनि पायीं
घेईन मुक्त खेळून—१

हा भवरा जननिंदेचा
ह्या इथेंच भिरभिरणारा
खेंचून शांत मननौका
निज तळ दाखविणारा—२

परि मन्मन स्वैरविहारी
धांवते गगन चुंबाया
ह्या छंदासाठीं आणि
ही हलकी होते काया—३

मज सोबत वायुलहरी
रथ गरुडाचा न्यायाला
हे इंद्रधनूचें रंग
झगमगती नेसायाला—४

मी धुंदींत फिरूनी येते
स्मृति घेऊन त्या मायेची
मग खुशाल तुडवा आणि
मी माती पायदळीची—५

[ **कल्पना :**—आपल्याकडे मुलीची आई नातू झाल्याशिवाय जांवयाकडे जेवत नाहीं. जेव्हां मुलीला मुलगा होतो तेव्हां स्वतः विहिणबाई तिला बोलावणें करतात; खालील ओव्यांची कल्पना अशी कीं, दोघी विहिणीविहिणी आपापल्या परीनें नातवाचें वैशिष्टय सांगतात. एकीला मूल आईसारखें वाटतें तर दुसरीला बापासारखें ! त्यावेळीं झालेलें संभाषण खालीं गुंफलें आहे त्यांत वरील व्रताचाही उल्लेख मजेदार रीतीनें येतो. ]

बाई आज झाला मला । नातू पहिला वहिला
कृपाप्रसाद लाभला । भगवंताचा— ॥ १ ॥

बघावा हो विहीणीबाई । माझ्या लेकीचा हा लेक
खोड्या करीतो अनेक । श्याम जैसा— ॥ २ ॥

थोर वंशाचा हा दिवा । गोकुळांतला विसांवा
मंजुळही पावा किंवा । कृष्णाचा हा —॥ ३ ॥

माझ्या वेलीचे हें फूल । गोजिरें हांसरे बाळ
आईचा ठेवा अमोल । अनुपम —॥ ४ ॥

बरं कां हो नातू माझा । दुधावरची साय
कोमल नाजूक काय । पिल्याजैसी —॥ ५ ॥

रसाळ पायरीची कोय । प्रतिमा ही दुजी माय
बोलायाची नाहीं सोय । मुळीं बाई —॥ ६ ॥

याला मांडीवरी घेते । बाळलेणीं चढविते
यानें वाढविलें नातें । दोन्ही कुळीं —॥ ७ ॥

ऐसेचि प्रेम ठेवावें । मला बारशा बोलवावें
माझें अगत्य करावें । आजी झाले —॥ ८ ॥

कशा हवें सांगावयां । येईन मी बोलवाया
या हो विहीणी जेवावयां । सोडा व्रत —॥ ९ ॥

झाले माझें समाधान । नको मला मानपान
केवळ अमृतवचन । होई पुरे —॥ १० ॥

नभोवाणीच्या सौजन्यानें–जून १९५५.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. 90043
शाखा (स्थान प्रत)

# सांखळी

आली सायंकाळ पुन्हां,
पुन्हां दिन उगवला
त्याच त्याच क्रमाचाही
आला बाई ग कंटाळा — १

आज येई पावसाळा
उद्यां शिशिराला भर
त्याच त्याच सांखळींत
नाहीं कुठें कुरबूर — २

नाहीं नाविन्य कशांत
नाहीं नवें ओलाव्यांत
तोच गंध, तिच फुलें
नित्य वेळीं खुलतात — ३

एक मात्र देव माझा
सदा नवा वाटे मला
हरएक संकटांत
नव्या रुपें गवसला — ४

# विटेवरच्या विठ्ठलाची रखुमाई

लाखांत लाभले भाग्य तुला ग बाई
विटेवरच्या विठ्ठलाची झालीस रखुमाई ॥ धृ० ॥

मेघांहुनी जो हंसरा श्यामल
चंद्राहुनी जो अधिकही शीतल
नाम जयाचें मुखांत येतां रूप दिसे ग ठाईं ठाईं ॥

भक्तांचा जो असे आसरा
ह्या विश्वाचा हरी मोहरा
क्षणांत इकडे क्षणांत तिकडे हांकेला ग धांव घेई ॥

मंगल भावगीतें.

# पाहिला श्रीरंग, ग

पाहिला मी घनश्याम पाहिला श्रीरंग, ग
चंद्रभागे तीरीं हरी संतमेळीं दंग, ग ॥ धृ० ॥

मुखावरी ज्याच्या बाई विलसते तेज
अंगगावरी लेई भक्तिचा ग साज
रमविण्या मिरा ज्याला गातसे अभंग ।

वदनांत सावळ्याच्या ज्ञानयाची वाणी
शोभतो मुक्तिचा हा सोपान नयनीं
भालावरी निवृती अन् हरी नामी गुंग ।

तुकयाची गाथा ज्याच्या गळीं हांसे
पितांबर भागवती पांडुरंग नेसे
नामानें ग शेल्याचा खुलविला रंग ।

मंगल भावगीतें

# केवळ तुझिया साठीं

भाव माझे आतुरले
ओंठपाकळ्यांच्या कांठीं
तुझ्या चुंबनासाठीं । १

वृत्ती हळूं थरकली
ओणविते कानापाठीं
एक तुझ्या शब्दासाठीं । २

बावरली काया शुभ्र
सुटे संयमाची मिठी
तुझ्या आलींगनासाठीं । ३

लपे वर्षा नयनांत
जरी उमाळ्यांची दाटी
तुझ्या प्रितीधारेसाठीं । ४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २४१५९........ दि: ३।८५........
क्रमांक ....१७२१....... नों: दि: ..३०।११।८५

# बालक

सुगंध फुलाचा सांठविला अत्तरांत
रस प्रितीचा ग बालकाच्या हास्यांत ॥ १ ॥

प्रभा रवीचीही नभ नित्य लेई
प्रतिमा मनांची बालकांत येई ॥ २ ॥

पेयांत लागे गोडी साखरेची
संसारीची मधुता खोडी बालकाची ॥ ३ ॥

छटा लाजतांना उमटते गालावरी
समाधान मन्मनीचें बालकाच्या मुखावरी ॥ ४ ॥

देवाठायीं राही सदा सुखी भक्त
जीवनाची पूर्तता एक बालकांत ॥ ५ ॥

## आज पटते जिवाला

म्हणते रे जग तुजला
जीवनीची संजीवनी
तुजजवळीं खेळतही
अद्भुत मनमोहीनी — १

जेथतेथ तव दृष्टी
सौख्याची मधु वृष्टी
सहवासीं प्रेम जडे
भाव हळूं लवथवती — २

पाहियलें तूंच मला
मुग्ध कळीं हंसले मी
बोले मन अभिमानी
जिंकीयलें तुजला मी — ३

वेडी खुळी ! नकळतां
बेसावध राहियले
पारधीले कोणकुणी ?
पुरी मीच विरघळले — ४

आज पटते जीवाला
जातां तूं सोडुनियां
जखम मला आंत खोल
राहीयली जाळावया — ५

# रे श्यामसुंदरा !

रे श्यामसुंदरा नंदकुमारा बाळा
तव रुप गोजिरें, भुलवि कसें राधेला ? ॥ धृ० ॥

हळुं हांसत येती, अधीर किती बघ गोपी
तुझी अगाध लीला, मनीं नाचवी प्रिती
झणीं आवर रे, आवर तव मुरलीला —१

बघ धेनु थांबती, चाहुल तव येतां
ही यमुनामाई तुजवर करीते ममता
जणुं विश्वची रे, फसले तव मोहाला —२

या तुझ्या पावलींत वसुधा सारी नाचे
मूर्तींत तुझ्या या स्वर्ग मला कीं भासे
हरी कशास मुरली, नाम पुरे भक्ताला —३

# नीज

रात येतां येई मनीं
  शांत मुग्ध नीज हवी ।
मिटलेल्या पापणींत
  दिन सुखें तरळावी ।  १

चांदण्याची शेज घ्यावी
  अर्धचंद्र उशीखालीं
अंगावरी मेघ शाल
  कुणीं तरी पांघरावी ।  २

रातराणी सोबतीला
  गंध ओला जोजवाया
यावी परीराणी छोटी,
  कुशीमधें लपवाया ।  ३

सैल सैल काया मग
  भविष्यांत पहुडावी
अंधुकशा धुक्यांत त्या
  दु:खें वितळुनी जावीं ।  ४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम .......... वि: ..........
क्रमांक .......... नों: दि: ..........

# गंधकुपी

पाकळ्या फुलारतां
गंधकुपी गुलाबाची
अवचित बावरली
उडे त्रेधा सानुलीची ॥ १ ॥

लपलेली होती आंत
लालबुंद महालांत
परागाचे सवंगडी
तैनातीस सदोदीत ॥२॥

अचानक उघडतां
असा दींडी दरवाजा
निमिषांत सौंदर्याचा
शत्रूकडे गाजावाजा ॥ ३ ॥

कावा गनिमी जाहला
क्षणार्धांत रथ आला
कुपी उचलोनी वारा
भरधांव दूर गेला ॥ ४ ॥

फूल इथें एकलेंच
वाट पहात राहीलें
झुरझुरुनीयां आणि
पस्तावुनी कोमेजलें ॥ ५ ॥

# तहान

चंडोलाची स्वप्नें मला पुन्हांपुन्हां पडतात ॥ ध्रु० ॥

वाटचाल जीवनाची
करते ही श्रांत काया
आली मध्याह्नींस आतां,
सांज लागे दिसावया
अशावेळीं स्वप्नें माझा पाठलाग करतात—॥ १ ॥

तारुण्यांत होती धुंदी,
खोटी निश्चयाची ऐट
उन्मत्ताच्या पोटीं होती
प्रलयाची धीट लाट
अशावेळीं आकांक्षेनें पुरा होतो बेहोषित—॥ २ ॥

आणि मग विसरलों
व्यवहारी सोरें सारें
प्रवाहांत आलों कुठें
जिथें आवर्तांचे वारे
चक्रांत त्या केंद्रभागीं असा उभा जगतांत ॥ ३ ॥

आहे निर्बलाचे मला
आज भक्कम वेष्टण
उडवाया हवें मज,
माझ्या स्फूर्तींतील प्राण
अशावेळीं स्वप्नें मज पुन्हांपुन्हां टोंचतात ॥ ४ ॥

जरी जाणीव मनाला
माझ्या हीन सामर्थ्यांची
तरी तृष्णा चिथवते
आग मेल्या विचारांची
त्याची झळ सोसायाची उरलेल्या आयुष्यांत ॥ ५ ॥

## तुझ्यांतच पाहते मी

तुझ्यांतच पाहते मी
  प्राजक्ताची खुलावट
लाल ओंठांमागें हांसे
  दंतपाकळ्यांची ऐट ॥ १ ॥

तुझ्यांतच पाहते मी
  रंग पीत केवड्याचा
उजळीतो आणिकच
  साज तुझ्या यौवनाचा ॥ २ ॥

तुझ्यांतच पाहते मी
  अबोलीची कोमलता
फुंकरीनें दुखावेल
  अशी आहे भावलता ॥ ३ ॥

तुझ्यांतच पाहते मी
  जाईचमेलीचें जग
सुवासांत स्वभावाच्या
  विसरावी तगमग ॥ ४ ॥

तुझ्यांतच पाहते मी
  विसांवली फुलराणी
बैसलेली खोदवीत
  शब्दअत्तरांची लेणीं ॥ ५ ॥

"श्री दीपलक्ष्मी" दिवाळी-अंक, १९५८.

## माहेराची पाउलवाट

हीच सखे माझ्या बाई, माहेराची पाऊलवाट
ओळखीच्या ह्या खुणा हा मधु घुंगुरांचा नाद ॥ धृ० ॥

वाहे वायु झुळझुळा
हांसे बाई रानमळा
जल देई गोड सांथ, तालावरी वाजे मोट ॥ १ ॥

किलबीलती पांखरें ग
बोलतात हळूंच कानीं
ह्या इथेंच घुमले तुझिया यौवनीचें संगीत ॥ २ ॥

ही वेस सखे माहेराची
सासरीं ग जातांना मी
ओलांडीली, सोडीली अन् माऊलीची साथ ॥ ३ ॥

ह्याच वाटेनं मी गेले
सुखाच्या ग संसारांत
पुन्हां भेटीनें हा झाला पांपणीचा ओला कांठ ॥ ४ ॥
....माहेराची पाऊलवाट

नभोवाणीच्या सौजन्यानें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 28708 वि: 3104
क्रमांक ... नों: दि: ...

REFBK-0010053
REFBK-0010053



सौ. शांताबाई जोशी या कवयित्री म्हणून वाचकांच्या फार पूर्वीपासून परिचयाच्या आहेत. त्यांचा जन्म नगर जिल्ह्यांत नेवासे येथें १९१७ सालीं झाला. वयाच्या १४ व्या वर्षीच त्यांनीं संसारांत पदार्पण केलें. लग्नानंतर त्यांचे शिक्षण पुरें झालें. प्रथमपासूनच त्यांचा काव्याकडे विशेष ओढा होता. त्यामुळें या व्यासंगाकडे त्यांनीं प्रथमपासूनच लक्ष्य पुरविलें. त्या दादरमधील कार्यकर्त्या असून परदेश प्रवासही करून आल्या आहेत.

" बंधरेषा " हा त्यांचा दुसरा काव्यसंग्रह असून या संग्रहांतील गीतें सरळ, सुंदर व आकर्षक शैलीची आहेत. त्यांच्या ध्वनिमुद्रित झालेल्या कांहीं भावगीतांचा समावेशही या संग्रहांत केला आहे. तसेंच इतरही नादमधुर भावगीतें संग्रहाला उठाव आणणारी आहेत. त्यामुळें " बंधरेषा " वाचकांना आवडेल अशी आशा वाटते.

सौ. शांताबाई जोशी यांचा " स्वप्नभूमि " हा तिसरा काव्यसंग्रह लवकरच वाचकांच्या भेटीस येणार आहे.

---

कव्हर : सर्वोदय प्रिंटर्स, मुंबई ४